संपादकीय

# शिक्षणाचे वारे की वाऱ्यावर शिक्षण





भारतातील ६५% नागरिकांचे सरासरी वय ३५ पेक्षा कमी आहे. म्हणजे युवापिढीची लोकसंख्या ७० करोड पेक्षा जास्त आहे. देशात साधारण ४,००० इंजिनिअरिंग कॉलेजेस मधून १५ लाख इंजिनिअर दरवर्षी बाहेर पडतात, त्यातील केवळ १०% ते १५% नोकरी मिळण्याच्या पात्रतेचे असतात असे रिसर्च सांगतो. इंडियन मेडिकल असोशिएशनच्या २०१६ च्या विधानानुसार भारतात २,००,००० पेक्षा जास्त बेरोजगार डॉक्टर्स आहेत जे ग्रामीण भागात जाऊन सेवा पुरवू शकतात. विरोधाभास म्हणजे भारतात ५,००,००० डॉक्टर्सची तातडीची गरज आहे, पण तेवढे डॉक्टर्स सरकारी कॉलेजमधून तयारच होत नाहीत. वर्षात साधारण केवळ ६०,००० डॉक्टर्स भारतात तयार होतात. खासगी कॉलेज–मध्ये एका डॉक्टरला शिक्षणासाठी साधारण ५० लाखापासून पुढे ४–५ करोडपर्यंत खर्च येतो जे मध्यम वर्गीय हुशार मुलांच्या ऐपतीपलीकडे आहे. इतर अनेक प्रकारच्या तंत्रशिक्षित किंवा बाकी शाखेतील पदविधारकांची उद्योग व्यवसायाला गरज आहे, परंतु कॉलेजमधून बाहेर पडून त्यांना थेट लागलीच नोकरी मिळेल अशी परिस्थिती नाही. स्किल इंडिया, स्टार्ट अप इंडिया या योजनांची अंमलबजावणी यथातथाच आहे.

**भारतात ५,००,००० डॉक्टर्सची तातडीची गरज आहे, पण तेवढे डॉक्टर्स सरकारी कॉलेजमधून तयारच होत नाहीत. वर्षात साधारण केवळ ६०,००० डॉक्टर्स भारतात तयार होतात. खासगी कॉलेजमध्ये एका डॉक्टरला शिक्षणासाठी साधारण ५० लाखापासून पुढे ४–५ करोडपर्यंत खर्च येतो, जे मध्यमवर्गीय हुशार मुलांच्या ऐपतीपलीकडे आहे.**

२०१८ च्या नवीन शैक्षणिक वर्षास नुकतीच सुरवात होत आहे. शिक्षणाचे वारे कुठल्या दिशेने वाहत आहेत ते फारच ठळकपणे समोर येत आहे. सीबीएसई च्या पेपरफुटीमुळे अगोदरच मंडळाची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. विद्यापीठांचे निकाल वेळेवर लागत नाही, त्यामुळे परीक्षा या अजस्र तंत्राचा बोजवारा उडाला आहे. शिक्षक कमी पगार मिळतो किंवा मिळतच नाही म्हणून संपावर जाण्याच्या धमक्या देताहेत किंवा संप करत आहेत. जे संप करू शकत नाहीत, धनदांडग्या शिक्षण सम्राटांना आव्हान देऊ शकत नाही, ते निराशेपोटी पाट्या टाकत आयुष्य काढत आहेत. कुठे सोयीची नोकरी मिळत नाही म्हणून नाईलाजाने शिक्षक, प्राध्यापक होणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. ज्यांना आपल्या दर्जामुळे, व्यापारी कौशल्यामुळे शिक्षणाचा बाजार मांडून ट्युशन क्लासेस सुरु करता येतात ते अनियंत्रित अनिर्बंध शिक्षणाचा बाजार मांडताहेत. शिक्षणाचा दर्जा त्यामुळे खालावत आहे. पालक न परवडणारी फी देऊन कमी प्रतीच्या शिक्षणाच्या नावाने ओरडताहेत. मुले/मुली सो कॉल्ड टेक्नोलॉजी क्रांतीमुळे फळाला आलेल्या सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे व नवीन आयकॉन समोर दिसत नसल्याने भरकटत आहेत. उठसुठ कुठल्याही सेलेब्रिटीला आदर्श ठरवले जात आहे व त्याच वेगाने त्याच आदर्शाला त्वरेने अडगळीत टाकले जात आहे.

टेक्नोलॉजीचा वापर करून जरूर काही चांगले प्रकल्प उभे राहत आहेत, पण त्यांना मूळ प्रवाहात त्याच तडफेने, अधिकाराने सामावून घेतले जात नाही असे दिसते. दरवर्षी लाखाच्या संख्येने सर्व प्रतीचे तथाकथित इंजिनिअर, डॉक्टर बहुतांशी कालबाह्य ज्ञान, शून्य अनुभव घेऊन नोकऱ्यांच्या बाजारात येऊन वणवण भटकत आहेत. UPSC / MPSC च्या करोडो रुपयांच्या मार्केटच्या मृगजळाचा पाठलाग उच्चशिक्षित युवावर्ग करतो आहे आणि काही दिवसांनी निराश व हतबल होऊन मिळेल ती नोकरी शोधत आहे. आधीच IAS, IPS झालेले बहुसंख्य जणू काही आता जन्मभर आम्हाला झेला, आम्हाला कोण आता हात लावतो बघतो, या वृत्तीने ओरबडण्यात गुंतले आहेत. डॉक्टर बनण्यात तारुण्याची १० वर्षे व काही करोड रुपये घालवल्यानंतर बाहेर पडलेले सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर आता

लवकरात लवकर घालवलेले पैसे वसूल कसे करता येतील याच्या चिंतेत आहेत. स्वतः उद्योग सुरु करता येईल इतपत भांडवल शिक्षण संपेपर्यंत यांच्या किंवा पालकांच्या हातात शिल्लकच रहात नाही. हे काहीच न करू शकलेले इंजिनिअर डॉक्टर द्विपदवीधर बनून कॉलसेंटरच्या वातानुकूलित खुराड्यात असंख्य होतकरू तरुणपणाची उमेदीची वर्षे वाया घालवत आहेत. विद्यापीठांच्या कुलगुरूंना, प्राचार्यांना, प्राध्यापकांना आपली खुर्ची व नोकरी सांभाळण्यासाठी नको नको त्या लोकांची हांजी हांजी करावी लागत आहे. शिक्षणसम्राट शेकडो एकर जमिनीवर करोडोच्या इमारती उभ्या करतांना पायात असंख्य विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा बळी देताहेत. पुढाऱ्यांचे डोके या विस्कटलेल्या भरकटलेल्या तरुणांचा आपल्याला निवडणूक जिंकण्यासाठी व आपले उद्योग चालवण्यासाठी कसा उपयोग करून घेता येईल या दिशेने काम करतेय. सरकारच्या रोजगार निर्मिती प्रकल्पातून कोणाला रोजगार मिळाला हा संशोधनाचा विषय होऊ पाहत आहे. असंख्य बँकांना लुटून काही महान उद्योजक लुटारूंनी पोबारा केल्याने दिवाळखोरीत निघालेल्या बँका नवतरुण उद्योजकांना कर्ज देण्यास असमर्थता दाखवत आहेत. असा सगळा आनंदी आनंद आहे.

शिक्षणाचे वारे कुठल्या दिशेने जात आहेत, ते आताही दिसतेय व अजून काही वर्षांनी याची भीषणता अजून जाणवेल असे दिसते. मध्यमवर्गीय पालकांना दोन मुलांच्या शिक्षणावर १०+२+४+(२) या सोळा अठरा वर्षात सर्वसाधारण कमीत कमी ३२ लाख व जास्तीत जास्त ५ – ७ करोड रुपये खर्च करावे लागतात. मग त्यातून ही पिढी स्वतःच्या पायावर उभी राहते का? शिक्षित पिढी सुशिक्षित होते आहे का? समर्थ होते आहे का? या पिढीमध्ये निर्मितीक्षमता आहे का? सृजनशीलता असेलच तर त्याला सुरवातीपासून तसा वाव मिळतो का किंवा दिला जातो का? समाजात अशा सृजनशील, निर्मितीक्षम पिढीला सन्मान व धन मिळते का? आज समाजात दिसणारा धनिक हा आजच्या उच्चशिक्षित असण्याऱ्या तरुणापेक्षा मानाने, धनाने अधिक मोठा असेल तर तो या शिक्षणाचा अपमान समजायचा का? उच्चशिक्षित होऊन केवळ लुटणे हाच एककलमी कार्यक्रम राबवणाऱ्या अधिकारी वर्गाने याच समाजाचा व शिक्षणाचा अपमान केला असे समजायचे का? प्रचंड मेहनत करून महागडे शिक्षण घेऊन जेव्हा नोकरीच्या बाजारात ही तरुण पिढी येते व रिक्षावाल्यापेक्षा किंवा चहावाल्यापेक्षा कमी कमवते तेव्हा तो त्याच्या पालकांच्या आयुष्यभराच्या कष्टाचा, तरुणांच्या शिक्षणाचा व समाजाच्या विश्वासाचा प्रचंड अपमान समजायचा का?


हा प्रश्न जेवढा भारतात राहणाऱ्या जनतेचा आहे तेवढाच किंवा त्याहीपेक्षा जास्त भारताबाहेर राहणाऱ्या अनिवासी भारतीयांचा देखील आहे. त्यांची आर्थिक गुंतवणूक व भविष्याबद्दल संदिग्धता कदाचित भारतात राहणाऱ्या पालकांपेक्षा जास्तच असेल. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे खरे तर शिक्षणाचा खर्च कमी व्हायला हवा, शिक्षण अधिक समाजाभिमुख, उद्योगाभिमुख, निर्मितीक्षम व्हायला हवे. पण हे कायदे, नीती करण्याची क्षमता व अधिकार ज्यांच्या हातात आहे, त्यांची धृती, सदसद्विवेकबुद्धी, नीतिमत्ता व संवेदनशीलता किती जागृत आहे, हा देखील यक्षप्रश्न आहे. त्याची ही धृती लवकरात लवकर जागृत होवो व सध्या वाऱ्यावर असलेल्या शैक्षणिक क्षेत्राचे वारे योग्य दिशेने वाहू लागो, हीच नवीन शैक्षणिक वर्षाच्या निमित्ताने सर्व सृजनशील पालकांना, विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, समाजातील विचारवंतांना सदिच्छा!

– डॉ. संदीप कडवे, ६ एप्रिल, २०१८

# श्रीदासबोध – दशक पाच – समास ५

## ।। बहुधाज्ञान निरूपण ।।

**समर्थ रामदास**



जव ते ज्ञान नाही प्रांजळ। तव सर्व काही निर्फळ।
ज्ञानरहित तळमळ। जाणार नाही।।
बहुत केले विद्यापठण। संगीतशास्त्र रागज्ञान।
वैदिक शास्त्र वेदाधेन। हे हि ज्ञान नव्हे।।
नाना शब्दांची परीक्षा। नाना अर्थांची परीक्षा।
नाना भाषांची परीक्षा। हे ज्ञान नव्हे।।
नाना लाघवे चित्रकळा। नाना वाद्य संगीतकळा।
नाना प्रकारे विचित्र कळा। हे ज्ञान नव्हे।।
आदिकरूनि चौसष्टि कला। याहि वेगळ्या नाना कळा।
चौदा विद्या सिद्धी सकळा। हे ज्ञान नव्हे।।
जाणावे दुसऱ्याचे जीवीचे। हे ज्ञान वाटे साचे।
परंतु हे आत्मज्ञानाचे। लक्षण नव्हे।।
ऐसी जाणे अंतरस्थिती। तयासि परम ज्ञाता म्हणती।
परंतु जेणे मोक्षप्राप्ती। ते हे ज्ञान नव्हे।।

**१४ विद्या आणि ६४ कलांसह अगणित विषयांचे ज्ञान मानव प्राप्त करून घेतो. संसार-सागर तरून जाणे आणि जीवन सुखकर होणे, यांसाठी त्यांची आवश्यकता आहेच. परंतु, ती सर्व साधने आहेत हे ध्यानात ठेवले पाहिजे. खरे ज्ञान म्हणजे आत्मज्ञानच ! ते प्राप्त करून घेणे, हेच प्रत्येक व्यक्तीचे ध्येय असले पाहिजे. अधिकारी लोकांच्या मार्गदर्शनाने, आपली वाटचाल त्याच दिशेने असावी. एक ना एक दिवस लक्ष्यप्राप्ती होणारच!**